**एम.जे.सी. क्र. ५५/२०२५**
**बाबाराव** विरुध्द निरंक
**निशाणी क्र. ८ च्या पुढे**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०१ सचिन पुंडलिकराव गजभिये यांचा सरतपास शपथेवर श्रीमती. एस.पी. गजभिये वकीलांमार्फत सुरु.**

१३. माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते **नि.क्र.८** कडे आहे.

१४. मी माझ्या पुराव्यामध्ये माझे भाऊ मृतक अशोक पुंडलिक गजभिये, माझे वडील पुंडलिक शामराव गजभिये व आई द्रोपदा पुंडलिक गजभिये यांच्या मृत्यूच्या दाखल्याच्या प्रती अपलोड केल्या आहेत. त्याच्या मुळ प्रती न्यायालयासमक्ष हजर केल्या. त्यास अनु. **नि. क्र. ९ ते ११** देण्यात येते. मी मृतक अशोक पुंडलिक गजभिये व अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आधार कार्डच्या प्रती अपलोड केल्या आहेत. त्याच्या मुळ प्रती मी न्यायालयासमक्ष हजर केल्या. त्यास अनु. **नि. क्र. १२ ते १७** देण्यात येते. मी घर मिळकतीची टॅक्स पावती अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली. त्यास **नि. क्र. १८** देण्यात येते. मी माझे रेशन कार्डची प्रत अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली. त्यास **नि. क्र. १९** देण्यात येते. मी अर्जदार क्र. ५ यांचे रेशन कार्डची प्रत अपलोड केली आहे. त्याची मुळ प्रत न्यायालयासमक्ष हजर केली. त्यास **नि. क्र. २०** देण्यात येते. मी 'नवराष्ट्र' वृत्तपत्रामध्ये पब्लीक नोटिस दिनांक २०.११.२०२५ रोजी दिलेली आहे. ती अभिलेखावर अपलोड केली आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते.

**सदरचा अर्ज हा कोणत्याही पक्षकाराच्या विरोधात दाखल न केल्याने उलटतपास व फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.02.18 15:48:07 +0530

दिनांक – १८.०२.०२६.
सावनेर.

(एस. एम. गाडे)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
सावनेर, जि. नागपूर.